# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परीक्षा विभाग

संदर्भ : शिवाजी वि/परीक्षा/ दि. ०३-१०-२०२०

प्रति,

| | | |
|---|---|---|
| मा. प्राचार्य | मा. विभागप्रमुख/समन्वयक | मा. संचालक |
| शिवाजी विद्यापीठ संलग्नीत | सर्व अधिविभाग | दूरशिक्षण केंद्र |
| सर्व महाविद्यालये, | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |

विषय : मार्च/एप्रिल २०२० या सत्रातील परीक्षेच्या नियोजनाबाबत.
संदर्भ : १ शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/३०१, दिनांक ११-९-२०२०
२ शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/३०२, दिनांक ११-९-२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्रमांक १ व २ नुसार मार्च/एप्रिल, २०२० या सत्रामधील परीक्षांचे नियोजन ऑक्टोबर, २०२० मध्ये करणेबाबत कळविण्यात आले आहे. तथापी अद्यापी महाविद्यालयाकडून, विद्यार्थ्यांच्याकडून व पालकांकडून कोणत्या सत्राच्या परीक्षा होणार, वेळापत्रक, हॉलतिकीट, समरी, प्रेझेंट/अबसेंट इत्यादी बाबत विचारणा होत आहे. तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की,

१. जे विद्यार्थी अंतिम वर्षात आहेत त्यांचे, चालू अंतिम सत्रातील अथवा त्यामागील सत्रातील काही विषयांना अनुत्तीर्ण असलेल्या विषयांची तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मार्च/एप्रिल/मे २०२० साठी परीक्षा अर्ज भरलेला आहे अशा विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. त्यामध्ये अंतिम सत्र वगळून उर्वरित सत्रांच्या परीक्षा या महाविद्यालयांमार्फत/विद्यापीठ अधिविभागामार्फत आयोजित होणार आहेत.

१. तीन वर्षाचा अभ्यासक्रम : अंतिम सत्र ६ व पूर्वीचे सत्र ५,४,३ (अनुशेष असल्यास)
२. चार वर्षाचा अभ्यासक्रम : अंतिम सत्र ८ व पूर्वीचे सत्र ७,६,५ (अनुशेष असल्यास)
३. पाच वर्षाचा अभ्यासक्रम : अंतिम सत्र १० व पूर्वीचे सत्र ९,८,७(अनुशेष असल्यास)

२. दोन वर्षाच्या पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राखेरीज उर्वरित सत्रांच्या अनुशेषाच्या (सत्र १,२,३) परीक्षा महाविद्यालय/विद्यापीठ अधिविभागामार्फत आयोजित करण्यात याव्यात.

३. त्या त्या परीक्षेचे अंतिम सत्र सोडून पूर्वीच्या ३ सत्रांचे वेळापत्रक महाविद्यालयाने/विद्यापीठ अधिविभागाने केलेली आहे. ते करतांना एका विद्यार्थ्यांचे दोन पेपर एकाच दिवशी एकाच वेळी येणार नाहीत (दोन पेपरचा क्लॅश येणार नाही) याची दक्षता घ्यावी. अंतिम सत्राचे वेळापत्रक विद्यापीठामार्फत नजिकच्या काळात जाहीर होणार आहे.

४. अंतिम सत्राची समरी नेहमीप्रमाणे महाविद्यालयाच्या लॉगीन मधून काढण्यात यावी व त्यापूर्वीच्या सत्रांची रीपीटर विद्यार्थ्यांची समरी www.unishivaji.ac.in.→ Online Portal → Backlog student summary येथून कॉलेज लॉगीन मधून काढण्यात यावी

५. प्रवेश पत्र (हॉलतिकीट) नेहमीप्रमाणे ज्या त्या महाविद्यालयाच्या लॉगीन मधून विद्यार्थ्यांस उपलब्ध करुन देण्यात यावे.

६. पत्र क. शिवाजी वि/परीक्षकनियुक्ती/आरव्हीसी/३२१, दिनांक-२३-९-२०२० नुसार प्रश्नपत्रिका/ उत्तरपत्रिका तयार करावी, महाविद्यालयामध्ये सर्व सत्रांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करावे. महाविद्यालयामधूनच गुणांची एंट्री विद्यापीठ संगणक प्रणालीत करावी याकरिता महाविद्यालयास लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

७. विद्यार्थी हजर/गैरहजर नोंदीसाठी पूर्वीच्या पद्धतीचे मॅन्युअल रिपोर्ट वापरावेत.

तसेच अद्यापि ज्या विद्यार्थ्यांनी Online/Offline परीक्षा देण्याबाबतचा पर्याय संगणक प्रणालीमधून दिलेला नाही, त्यांना लवकरात लवकर देण्यासाठी अवगत करावे तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विद्यार्थी हितास्तव व कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या उद्देशाने Online पद्धतीने परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र-संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.